# देगलूर महाविद्यालयात वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार

**देगलूर/ प्रतिनिधी**

देगलूर महाविद्यालयातील कनिष्ठ विभाग विज्ञान शाखेतील वैद्यकीय तथा अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेत (Neet, Jee, MH CET) उज्ज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा अडत व्यापारी शिक्षण संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. देगलूर महाविद्यालयातील विज्ञान शाखेत शिकणारे विद्यार्थी वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन करून देगलूर महाविद्यालयाचा नाव लौकिक केला आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले




विज्ञान शाखेतील वैष्णवी गंगाधर कोलगाणे, शेख सुफियान अतिक , वीरेश पोकलवार ,साईनाथ पांचाळ व तसेच इतर विद्यार्थ्यांनी वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेत यश संपादन केले आहे.या विद्यार्थ्यांचा पालकांसोबत प्राचार्य डॉ मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, क.म.चे उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे ,पर्यवेक्षक एस.एन.पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आल. गुणवंतांचे अ. व्या.संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेबरेकर, उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, सचिव. शशिकांत चिद्रावार, सहसचिव सूर्यकांतराव नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, देवेंद्र मोतेवार , डॉ.कर्मवीर उन्नग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधरराव जोशी, रविंद्र धाडे, चद्रकांत नारलावार आदींनी कौतुक केले आहे. प्रारंभी अकरावी कला वाणिज्य विज्ञान शाखा प्रवेशा संदर्भात कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या प्रास्ताविकात प्रवेशप्रक्रिया, तासिकेचे नियोजन, पालक मेळावा नियोजन याबाबत कांबळे यांनी मार्गदर्शन केले. नंतर अकरावी विज्ञान कला तसेच वाणिज्य शाखेत ऑनलाईन प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशा संदर्भातील मार्गदर्शन व शाळा भेटीच्या सूचना संबंधित शिक्षकांना दिल्या. सूत्रसंचालन पर्यवेक्षक संग्राम पाटील तर आभार प्रदर्शन प्रा.शिवचरण गुरूडे यांनी केले.यावेळी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील सर्व शिक्षक, पालक, गुणवंत उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner